
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४४ वा
## वार्षिक दीक्षान्त समारंभ


८ डिसेंबर २००७

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्

B+
(★★★★★)
Accredited by NAAC



## प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे
कुलगुरू
### शिवाजी विद्यापीठ
यांनी सादर केलेला अहवाल.



## प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे

कुलगुरू

**शिवाजी विद्यापीठ,**

कोल्हापूर

# ४४ वा दीक्षान्त समारंभ

## प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे

कुलगुरू

## शिवाजी विद्यापीठ

यांनी सादर केलेला अहवाल

आजच्या पदवी प्रदान समारंभाचे प्रमुख पाहुणे व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्री. नागनाथअण्णा नायकवडी, ख्यातनाम लेखिका व समाजसेविका पद्मश्री डॉ. सुधा मूर्ती, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विद्या परिषद, अधिसभा, व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आजचे नूतन पदवीधर विद्यार्थी, उपस्थित मान्यवर, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो,

सुवर्णमहोत्सवी वर्षाकडे यशस्वी वाटचाल करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या दीक्षान्त समारंभात पदवी प्राप्त केलेल्या सर्व स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्यांना त्यांच्या भविष्यामध्ये उज्ज्वल यश प्राप्त होवो अशी सदिच्छा व्यक्त करतो.४४ व्या दीक्षान्त समारंभात विद्यापीठाच्या वर्षभराच्या महत्त्वपूर्ण घडामोडींचा अहवाल सादर करताना मला आनंद होतो आहे.

गेल्या काही वर्षात विद्यापीठाच्या धोरणात व कार्यप्रणालीत अपूर्व असे बदल होत आहेत. वेगवेगळ्या धोरणात्मक निर्णयांमुळे विद्यापीठ एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. यासाठी विद्यापीठ संरचनेमध्ये आमूलाग्र स्वरूपाचे बदल केले आहेत. आमच्या या समाजाभिमुख बदलांचे प्रतिबिंब या अहवालात आपणांस पहायला मिळेल.

- <u>सामंजस्य कराराचे नवे पर्व</u>

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपल्यासमोरील आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थी हितासाठी विद्यापीठाने अधिकाधिक उपयुक्त उपक्रम हाती घेतले आहेत. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठाने यावर्षी अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांशी आणि

विद्यापीठांशी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) केले आहेत. या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे बेंगलोर येथील इन्फोसिस बीपीओ लिमिटेड या संस्थेशी झालेला सामंजस्य करार ही होय. या करारामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. अशा प्रकारचा सामंजस्य करार होणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. इन्फोसिस फाउंडेशन समवेत झालेल्या कराराअंतर्गत २२५ संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांना म्हैसूर येथे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. या शिक्षकांच्या द्वारे ५,००० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बीपीओ प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच याच कराराअंतर्गत अंतिम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या ८७ विद्यार्थ्यांची इन्फोसिंस फाउंडेशन तर्फे प्रशिक्षणार्थी म्हणून निवड झाली आहे. यातील पात्र विद्यार्थ्यांना कायम सेवेची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने **कॅनडा** येथील **(Consortium of Universities in Ontario)** मधील **१४ विद्यापीठांच्या** समवेत अत्यंत महत्त्वाचा सामंजस्य करार झाला आहे. लीव सेंटर ऑफ इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस रिसर्च (**LCISR**) **युक्रेन** व युनिव्हर्सिटी ऑफ पॉलिटिअर्स, **फ्रान्स** या संस्थांशी विज्ञानविषयक संशोधनासाठी व देवाणघेवाणीसाठी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच गिफु युनिव्हर्सिटी, **जपान**, युनिव्हर्सिटी ऑफ ब्राझिलिया फौंडेशन, **ब्राझिल** आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्पेस रिसर्च, **ब्राझिल** या संस्थांबरोबर संशोधन आणि विकास क्षेत्रातील सहयोगाबद्दल सामंजस्य करार करण्यात आले आहेत. तसेच नुकत्याच दिलेल्या चीन भेटीदरम्यान शांघाय जिओ टॉन्ग युनिव्हर्सिटी, **शांघाय, चीन** या संस्थेशी मास कम्युनिकेशन, डिझाईन ॲण्ड मिडिया इंटरडिसिप्लिनरी स्टडीज बाबत **Letter of Intention** झाले आहे. महाराष्ट्रातील चार विद्यापीठांचा एकत्रित तसेच अन्य राष्ट्रीय संस्थांशी माहिती तंत्रज्ञान, विज्ञान व संज्ञापन माध्यम विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना व्यवसाय, प्रशिक्षण व संशोधनाची संधी उपलब्ध होत आहे. **साबरागामुवा विद्यापीठ, श्रीलंका यांच्याशी झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातील २७ विद्यार्थ्यांनी श्रीलंकेस भेट दिली. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी परदेशी शिक्षण संस्थेस भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.**

- <u>सामाजिक बांधिलकी व समावेशक धोरण</u>

समाजातील वेगवेगळ्या घटकांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळावा आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सर्व समाज घटकांचा योग्य प्रमाणात समावेश असावा हे धोरण डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आर्थिक प्रश्नाअभावी कोणताही घटक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच डॉ. अप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन अंतर्गत *'कमवा व शिका योजना'* कार्यान्वित आहे. शिक्षणाबरोबरच अर्थसहाय्य आणि श्रमाचे मोल रूजवणारी *'मागेल त्याला काम'* (**Work on Demand**) ही योजना सुरू करण्यात आली आहे. भारतात या प्रकारचा उपक्रम राबविणारे शिवाजी विद्यापीठ हे प्रथम विद्यापीठ होय. यातून एका अर्थाने उच्च शिक्षणाची हमी गरजूंना प्राप्त होते.

दुसरी गोष्ट म्हणजे कोल्हापुरातील चर्मोद्योग क्षेत्रातील स्थानिक कामगारांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून त्यांना चेन्नई येथे प्रशिक्षणास पाठविले जाते. या उपक्रमाची दखल खा. काशिराम राणा यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समितीने घेतली व कोल्हापुरास भेट दिली. लोककलेच्या विकासासाठी विद्यापीठाने लोककला केंद्र स्थापन केले आहे. शाळेतील शिक्षकांना गणिताचे प्रशिक्षण देणे, कोल्हापूर शहराचा माहिती तंत्रज्ञान व संगणक केंद्र म्हणून विकास करण्यासाठी **I.T. Advantage** च्या माध्यमातून कोल्हापूर आय.टी. हब बाबत प्रयत्न सुरू आहेत. उद्योगधंदे आणि संशोधक यांच्यात जवळचे संबंध स्थापन करून त्यांच्या निकटच्या संबंधास चालना देणे या गोष्टींच्या द्वारा विद्यापीठ लोकजीवनाशी समरस होत आहे. समावेशन धोरणाचा भाग म्हणून विद्यापीठाने आरक्षणाच्या धोरणाची व्यवस्थितरित्या अंमलबजावणी केली आहे आणि मागास गरीब विद्यार्थ्यांना अनेकविध सुविधा पुरविल्या आहेत.

विद्यापीठ, शासन आणि शिखर संस्थेची मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्याने विद्यार्थ्यांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देण्यास सुरूवात केली आहे. तसेच प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी घ्यावयाच्या काळजीसंदर्भात विद्यापीठ जाहिरातही प्रसिध्द करते.

विद्यार्थी हा दूत (**Brand Ambssador** ) मानून राज्य शासनाच्या निर्मलग्राम योजनेअंतर्गत केलेल्या कामाची दखल घेऊन **UNICEF** प्रायोजित गाव सूक्ष्म नियोजन व अंमलबजावणी बाबत जिल्हा परिषद सांगली यांनी जिल्ह्यातील तीन लाख कुटुंबांच्या सर्वेक्षणाचे कामही विद्यापीठास दिले आहे. विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील

मागासवर्गीय आणि अपंग अनुशेष भरतीसाठी विद्यापीठाने विशेष प्रयत्न केले आहेत याची दखल अनुसूचित जाती जमाती कल्याण समितीने घेतली आहे.

- शिष्यवृत्ती

शिवाजी विद्यापीठ गुणवान तसेच आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या प्रदान करते. यापूर्वीच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती या योजनेने मोठा लौकिक प्राप्त केला आहे. विद्यापीठाने या वर्षापासून अपंग, निराधार तसेच क्रीडा नैपुण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्तीची योजना सुरू केली आहे. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठ अनुदान आयोगाने या वर्षापासून प्रथमतःच मागासवर्गीय संशोधक विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या *'राजीव गांधी शिष्यवृत्ती'* योजनेत भारतात सर्वात जास्त शिष्यवृत्त्या शिवाजी विद्यापीठातील ३९ विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या आहेत. यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून रूपये ९६,३५,२००/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे. प्रथमच पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सर्व शिष्यवृत्त्यांसाठी मंजुरीपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष रक्कम प्राप्त होण्यापूर्वी विद्यापीठ निधीतून दरमहा ही रक्कम आदा करण्यात येते.मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठ अधिविभागातील अपंग विद्यार्थिनीस महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील गुणवंत विद्यार्थी म्हणून मा. कुलपती यांचे हस्ते राष्ट्रपती पारितोषिकाने गौरविण्यात आले.

- नव्या रूपातील विद्यापीठ कॅम्पस

विद्यापीठ परिसरामध्ये शिक्षण व संशोधनाचा उच्च दर्जा राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यासाठी विद्यापीठातील सर्व विभागांचे नूतनीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या वर्षभरात काही नवीन इमारतींचे बांधकाम सुरू आहे. तंत्रज्ञान विभाग इमारत, परीक्षा भवनच्या इमारतीचा विस्तार व वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना सामावून घेण्यासाठी विद्यार्थिनीं वसतिगृहाच्या इमारतीचे काम सुरू आहे. लवकरच ते पूर्णत्वास येत आहे. परिसराच्या सुशोभिकरणाकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. लॅण्डस्केपींगची विविध कामे सुरू आहेत. पाणीसाठ्याच्या स्वयंपूर्णतेच्या बाबतीत विद्यापीठाने विकसित केलेल्या सरोवरांचा मोठाच उपयोग होतो आहे. यामुळे विद्यापीठ पाण्याबाबत स्वयंपूर्ण झाले असून परिसराच्या सौंदर्यातही भर पडली आहे. यावर्षी विद्यापीठ परिसरात

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदरावजी पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. मूलभूत सोयीसाठी आवश्यक असणाऱ्या अखंडित वीजपुरवठ्यासाठी विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशी एक करार केला आहे. त्यानुसार मंडळाने एक उपकेंद्र (**Express Feeder**) विद्यापीठ परिसरात कार्यान्वित केले आहे.

- <u>अनुदान</u>

विद्यापीठातील संशोधन व विस्तार कार्यासाठी वर्षभरात विविध माध्यमातून भरघोस अशा प्रकारचे अनुदान प्राप्त झाले आहे. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर वित्तीय संस्थांकडून विद्यापीठास विविध प्रकल्पांतर्गत गतवर्षी रूपये २,४६,७७,२०५/- इतके अनुदान मंजूर झाले होते. तर गतवर्षीपेक्षा यावर्षी रूपये ४,४९,५९,०८३/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे म्हणजेच अनुदानात जवळजवळ दुपटीने वाढ झाली आहे.

- <u>संशोधन (**SAP** व **FIST** अधिविभाग)</u>

विविध विद्याशाखांच्या विकासास योगदान करणारे संशोधन करणे हे विद्यापीठाचे प्रमुख कार्य आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. सध्या विद्यापीठाच्या पाच अधिविभागांना विद्यापीठ अनुदान आयोगाने सॅप योजनेखाली विशेष संशोधन अनुदान दिले आहे तर सहा अधिविभागांना भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागाने फिस्ट या योजनेखाली अनुदान मिळाले आहे. फिस्ट, सॅप व असिस्ट या तीनही योजनेअंतर्गत पदार्थविज्ञान अधिविभागास अनुदान प्राप्त झाले आहे. असे अनुदान प्राप्त करणारा हा भारतातील एकमेव विद्यापीठ अधिविभाग आहे. विद्यापीठाने यु.जी.सी. कडे **University of Potential for Excellence** (**UPE**) खाली मान्यता प्राप्त करण्यासाठी तीस कोटींचा प्रस्ताव सादर केला आहे.

- <u>अभ्यास केंद्रे व अध्यासने - अभ्यासाच्या नव्या दिशा</u>

विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाय्याने पाच विशेष अभ्यास केंद्रे, तीन अध्यासने स्थापन केली आहेत. या सर्व केंद्राचे/ अध्यासनांचे अध्यापन, संशोधन, विस्तार कार्य व लोकशिक्षणाचे काम सुरू आहे. यापूर्वी गांधी अभ्यास केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, स्त्री अभ्यास केंद्र, राजर्षी

शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्र तसेच रा.ना.गोडबोले अध्यासन, भगवान महावीर अध्यासन व बँक ऑफ इंडिया अध्यासन ही अध्यासने व अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. यावर्षी विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठात पंडित जवाहरलाल नेहरू अभ्यास केंद्र स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. समाजजीवनातील तळातील उपेक्षित व वंचित समुहाच्या बहिष्कृततेचा व त्यांना विकासाचे लाभ देणा-या समावेशन धोरणाचा अभ्यास करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या विद्यापीठात **Centre for Study of Social Exclusion and Inclusive Policy** हे केंद्र स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने अशा प्रकारची भारतभरात १३ केंद्रे सुरू केली आहेत. त्यापैकी शिवाजी विद्यापीठातील एक आहे. विद्यापीठाचा महत्त्वाकांक्षी असा ११ व्या पंचवार्षिक योजनेचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावाच्या आधारे संशोधन क्षेत्रात विद्यापीठ नवप्रवर्तन करू इच्छिते. विद्यापीठाने गेल्या वर्षभरात अनेक संशोधनपर शोधनिबंध, पुस्तके प्रकाशित केली आहेत. राजर्षी शाहू महाराजांची कागदपत्रे अनेक खंडात आम्ही प्रकाशित केली आहेत. सामाजिक बांधिलकीतून कोल्हापूरच्या कला परंपरेचे जतन करण्याच्या हेतूने कोल्हापूरच्या चित्रकलेचा इतिहास हे पुस्तक आम्ही प्रकाशित केले आहे. विद्यापीठ राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक धोरण, भारतीय राष्ट्रवाद, टिळक आणि आगरकर, महात्मा गांधींचे इतिहासशास्त्र इ. ग्रंथ प्रकाशित करणार आहे.

- अध्ययन, अध्यापन संशोधन व विस्तार कार्य, नवे उपक्रम

अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रातही शिवाजी विद्यापीठ नेहमीच अग्रेसर राहिले आहे. वेगवेगळ्या संशोधन शाखांमध्ये इथल्या संशोधकांनी लौकिक प्राप्त केला आहे. यावर्षी विद्यापीठाने देशातील तंत्रज्ञान क्षेत्राचा व संज्ञापन (**Communication**) क्षेत्राचा होणारा विस्तार लक्षात घेऊन नवे अभ्यासक्रम कार्यान्वित केले आहेत. रेडिओ जॉकी, एम.एस्सी. टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. फूड सायन्स, पोस्टग्रॅज्युएट डिप्लोमा इन इंग्लिश, हिंदी अ‍ॅण्ड मराठी ट्रान्स्लेशन, सिंहली भाषेतील पदविका कोर्स या नव्या अभ्यासक्रमांना या वर्षीपासून आरंभ झाला. तसेच उपयोजित रसायनशास्त्र (**Applied Chemistry**) या अभ्यास शाखेचे महत्त्व लक्षात घेऊन सदर अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

● <u>संलग्नित महाविद्यालये</u>

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र तीन जिल्ह्यात विस्तारलेले असून एकूण २०४ महाविद्यालये आणि ७ मान्यताप्राप्त संस्था संलग्नित आहेत. विविध वित्तीय संस्थांकडून मिळालेल्या भरघोस अनुदानातून आणि विद्यापीठाच्या सहकार्यातून विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांना, परिषदांना उपस्थित राहण्यासाठी रूपये ५,१५,०००/- रक्कम अनुदान देण्यात आले. पीएच.डी. प्रबंध प्रकाशनासाठी रूपये ३७,०००/- तसेच नवीन अभ्यासक्रमासंदर्भात २६ महाविद्यालयांनी विविध कार्यशाळांचे आयोजन केले. यासाठी रूपये ४,५०,०००/- अनुदान देण्यात आले. विविध विषयांवरील १६ चर्चासत्रांचे संलग्न महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. संलग्न महाविद्यालयांनी सादर केलेल्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या ३७ प्रस्तावांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली आहे. अनेक महाविद्यालयांनी रेमिडियल कोचिंग, करिअर ओरिएन्टेड अभ्यासक्रम, नेटवर्क रिसोर्स सेंटर, पायाभूत सुविधांकरिता भरीव अनुदान प्राप्त झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान प्राप्त होण्यासाठी २ एफ, १२ बी अंतर्गत जास्तीत जास्त महाविद्यालये समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाच्या विशेष प्रयत्नातून या वर्षभरात आठ (एकूण २ एफ, १२ बी सुमारे ८३) महाविद्यालयांचा समावेश झाला व भरीव अनुदान प्राप्त झाले आहे.

● <u>अधिविभागांना भेटी</u>

विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील अध्यापन संशोधन कार्य गतिमान करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक वर्षाच्या आरंभी कुलगुरू प्रत्येक विभागांना भेटी देऊन एकंदरीत कामाचा आढावा घेतात. तसेच अध्ययन, अध्यापन, संशोधन, विस्तार कार्य आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठातील पायाभूत सुविधा बाबत विद्यार्थी आपला फिडबॅक ऑनलाईनवर थेट पारदर्शकपणे विद्यापीठास कळवितात. अशा प्रकारचे संगणक प्रणालीद्वारे फिडबॅक घेणारे शिवाजी विद्यापीठ एकमेव विद्यापीठ आहे. या कार्यपध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, त्यांचे मानस समजून घ्यायला आम्हाला मदत झाली. आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षेप्रमाणे काही महत्त्वपूर्ण बदलही करता आले. ग्रंथालय मुक्तद्वार प्रवेश, लँग्वेज लॅब, इंटरनेट सुविधा व नव्या अभ्यासक्रमाच्या सोयी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या. याशिवाय अधिविभाग, सहयोगी सेवा (**Support Services** )

कार्यपध्दतीची समीक्षा करण्यासाठी आम्ही नॅकच्या धर्तीवर अंतर्गत सहयोगी समितीची (**Internal Peer Team** ) नियुक्त केली आहे. ही समिती दरवर्षी विविध अधिविभागास व सहयोगी सेवा विभागांना भेटी देते. अन्य विद्यापीठातील तज्ज्ञांचा समावेश या समितीमध्ये आहे. त्यामुळे अधिविभाग अधिकाधिक क्रियाशील व गतिमान, विद्यार्थीभिमुख झालेले आहेत. मणिपाल विद्यापीठास व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिष्ठाता, अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी यांच्या शिष्टमंडळाने दिनांक २३ ते २५ सप्टेंबर २००७ रोजी भेट दिली. अशा स्वरूपाचे भेटीचे आयोजन प्रथमच झाले आहे.

- कॅम्पस इंटरव्ह्यू - नवी उपलब्धी

विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवनव्या संधी प्राप्त होण्यासाठी गेल्या वर्षभरात विविध कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ अधिविभागातील प्लेसमेंटचे प्रमाणही ६० ते १०० टक्के आहे. कमी प्लेसमेंट असणाऱ्या अधिविभागातील विद्यार्थ्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत. तसेच नजीकच्या भविष्यात परदेशस्थ कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्ह्यूंचे व जॉब फेअरचे आयोजन करण्यात येणार आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, विद्यापीठातील वेगवेगळ्यां अधिविभागातील विद्यार्थ्यांची विप्रो, आयसीआयसीआय, एल.आय.सी, एशियन पेन्टस, रिलायन्स, अॅपटेक सॉफ्टवेअर यासारख्या नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

- चर्चासत्रे, व्याख्यानमाला व कार्यशाळा

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयात २१ व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालांस नामवंत वक्त्यांनी, विचारवंतांनी सहभाग नोंदविला. गेल्या वर्षभरात विद्यापीठाने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे, परिषदांचे आयोजन केले आहे. ५१ व्या अखिल भारतीय इंग्रजी शिक्षकांच्या परिषदेचे आयोजन केले होते. पदार्थविज्ञान विभागाने **Conference on Advancd Materials and Applications (ICAMA- 2007)** ,वनस्पतीशास्त्र अधिविभागाने **International Seminar on Changing Scenerio in Angiosperm Systematics** या विषयावरील चर्चासत्रांचे व परिषदांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वनस्पतीशास्त्र अधिविभागाने विकसित केलेली *'निलांबरी'* ही वनस्पती शेतक-यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. तिन्ही परिषदांना प्रत्येकी सुमारे ५०० शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

- <u>विद्यापीठ आपल्या दारी – 'दूरशिक्षण केंद्र'</u>

उच्च शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजातील घटकांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी म्हणून विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राची स्थापना केली आहे. या बहि:स्थ विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्यसामग्री पुरविण्यात येणार आहे. दूरशिक्षण योजनेअंतर्गत साहित्यनिर्मितीसाठी सहा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. मित्रहो, मला सांगायला आनंद होतो की, अशा प्रकारचे स्वयंअध्ययन साहित्य विद्यापीठात निर्मिती करणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पारंपरिक विद्यापीठामधील एकमेव विद्यापीठ आहे.

- <u>महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ</u>

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत. अग्रणी महाविद्यालय ( **Lead College**) हा उपक्रम विविध महाविद्यालयातून यशस्वीपणे राबविला जात आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच महाविद्यालयीन सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष उपक्रम राबविले जात आहेत. नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेंबर, २००७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणानुसार नवीन महाविद्यालयांना मान्यता देताना विशेष दक्षता घेण्यासंदर्भात कळविले आहे. मला सांगावयास आनंद होतो की, शिवाजी विद्यापीठाने यापूर्वीच अशा प्रकारचे निकष तयार करून पारदर्शक पध्दतीने ही प्रक्रिया राबविली आहे. यासंदर्भात प्रस्तावासाठी जाहिरात देण्यात येते. नव्या प्रस्तावांची माहिती संकेतस्थळावर ठेवणे व वृत्तपत्रात जाहिरात देऊन हरकती, सूचना समाजातील सर्व घटकांकडून मागविल्या जातात. सर्वच प्रस्तावधारकांसमवेत बीसीयुडी बैठकीत चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊन ही प्रक्रिया राबविली जाते. या प्रकारची पारदर्शक स्वरूपाची कार्यप्रणाली अंमलात आणली आहे. गत शैक्षणिक वर्षात दोन कला, वाणिज्य, विज्ञान तसेच दोन शिक्षणशास्त्र व एक औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास मान्यता दिली आहे. महाविद्यालयीन शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्या नियुक्तीच्या जाहिराती विद्यापीठ संकेतस्थळास प्रसिध्द करण्यास सुरूवात केली आहे त्यामुळे उमेदवारांना संदर्भासाठी जाहिरात एक महिना उपलब्ध राहते.

विद्यापीठाने प्रथमत: धोरणात्मक निर्णय म्हणून पदवीपूर्व बी.बी.ए./ बी.सी.ए. अभ्यासक्रमासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे विद्यार्थी संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित करण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे यशस्वीरित्या राबविली. पदवीपूर्व अभ्यासक्रमास

केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे.

- <u>परीक्षा विभाग</u>

परीक्षा विभागात अधिक गतिमानता व पारदर्शकता आणली आहे. त्यामध्ये या कार्यपध्दतीत अनेक बदल केले आहेत. विद्यापीठ दरवर्षी ५०० परीक्षांचे आयोजन करते. यापैकी बहुतांश परीक्षांचे निकाल हे ३० दिवसात जाहीर होतात. महत्त्वाचे म्हणजे प्रथमच अभियांत्रिकी विद्याशाखेचे निकालही ३० दिवसात जाहीर झाले आहेत. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून सत्रारंभाच्या दिवशी अध्यापनाचे कामकाज सुरू करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत देण्याची व पुनर्मूल्यांकनाची सोय उपलब्ध करून दिली आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबर ते ऑक्टोबर अशी बॅच कार्यान्वित केली आहे. एकाचवेळी दोन अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी घेण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. प्रवेश प्रक्रियांचे व परीक्षांचे सर्व अर्ज ऑनलाईन भरण्याची सुविधा प्राप्त करून देण्यात आली आहे. विद्यापीठ परीक्षांचे निकाल विद्यार्थ्यांच्या विषयवार गुणांसह विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतात. काही परीक्षांचे निकाल बी.एस.एन.एल. मोबाईलवर आय्.व्ही.आर.एस. प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.

- <u>प्रशासकीय सुधारणा</u>

शिवाजी विद्यापीठातील वित्त व लेखा विभागाचे संपूर्ण संगणकीकरण झाले आहे. लेखा विभागामार्फत प्रथमच लेखा संहिता (**Account Code**) तयार करण्यात आली आहे. त्यामुळे लेखा विभागाच्या कामकाजात सुसूत्रता व गतिमानता आली आहे. विद्यापीठातील कर्मचा-यांना संगणक खरेदीसाठी अनुदान, वैयक्तिक ग्रंथ खरेदी योजनेमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश, अशा प्रकारचे उपक्रम शिवाजी विद्यापीठाने महाराष्ट्रात प्रथम राबविले आहेत. माहिती अधिकार कायद्याची जाणीव व अंमलबजावणी यासाठी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. गोपनीय अहवाल लिहिण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. स्वच्छता अभियान योजनेअंतर्गत अधिविभाग

व प्रशासकीय विभाग यांची पाहणी तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात आली. विद्यापीठ वर्धापन दिनी गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक यांचा गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रशासनात गतिमानता आणण्यासाठी डॉ. अप्पासाहेब पवार गतिमान प्रशासन योजना लवकरच सुरू करण्यात येत आहे. विद्यापीठाचे शिवसंदेश हे ई-जर्नल नियतकालिक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून वाचकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विद्यापीठ इंटरनेट २ एम.बी.पी.एस. केल्याने इंटरनेट सुविधा गतिमान झाली आहे. यामुळे विद्यापीठ संकेतस्थळास भेट देणाऱ्या वाचक संख्येत विक्रमी वाढ झाली आहे. या वर्षभरात दोन कोटी पेक्षा अधिक **Hits** ची नोंद झाली आहे. तसेच विद्यापीठ ग्रंथालयामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली युजीसी इन्फोनेट ई- जर्नल्सचा वापर करणाऱ्या वाचकांची संख्या गेल्या वर्षभराच्या तुलनेत तीनपटीने अधिक वाढली आहे.विद्यापीठ *'ग्रंथालयात अभ्यासिका'* विद्यार्थी बैठकव्यवस्थेची क्षमता ३५० वरून ७५० केली आहे.

● <u>क्रीडा विभाग</u>

विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. गतवर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन केले. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठाने यावर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुस्ती (पुरुष व महिला) स्पर्धेचे आयोजन दिनांक १८ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २००७ अखेर केले होते. या स्पर्धेत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित मल्लांनी सहभाग घेतला. याप्रसंगी परिसरातील नामवंत मल्लांचा सत्कार केला. कुस्तीसारख्या देशी क्रीडा प्रकाराला एकप्रकारे चालनाच अशा प्रकारच्या स्पर्धेतून मिळाली. औरंगाबाद येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत विद्यापीठ खेळाडूने *'महाराष्ट्र केसरी'* हा किताब जिंकला. तसेच मुंबई येथे झालेल्या मल्लखांब स्पर्धेत विद्यापीठाच्या पुरुष संघास सुवर्णपदक प्राप्त झाले. तसेच आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत विद्यापीठ संघास द्वितीय स्थान प्राप्त झाले. नाशिक येथे झालेल्या *'अश्वमेध २००७'* क्रीडा स्पर्धेत अॅथलेटिक्स मध्ये सात सुवर्ण, चार रौप्य व आठ कास्य अशी एकूण १९ पदके मिळवून उज्ज्वल यश संपादन केले. सांघिकमध्ये एक सुवर्ण व चार कांस्य पदके मिळविली.

- <u>आव्हान-२००७</u>

महाराष्ट्रातील पहिल्याच आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या आयोजनाचा मान मा. कुलपतींनी शिवाजी विद्यापीठास दिला. या शिबीराचे उदघाटन मा.कुलपती महामहिम श्री.एस.एम. कृष्णा यांनी केले. या १२ दिवसांच्या शिबिरामध्ये महाराष्ट्रातील एन.सी.सी. मधील सुमारे ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- <u>राष्ट्रीय सेवा योजना</u>

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १४१ महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत आहे. यामध्ये सुमारे २०,००० विद्यार्थी स्वयंसेवक सहभागी झालेले आहेत. या योजनेअंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबीर, एडस जनजागृती अभियान, आपत्ती व्यवस्थापन शिबिर, रक्तदान, वृक्षारोपण आदि उपक्रम हाती घेतले आहेत. राज्यशासनाच्या निर्मलग्राम योजनेतही विद्यापीठ सक्रीय सहभागी झाले. याचा विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मोलाचा फायदा झाला. महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाची सहाय्यकारी साधन संस्था म्हणून निवड केली होती. विद्यार्थ्यांना यानिमित्ताने ग्रामीण लोकजीवनाचे व परिसराचे जीवनदर्शन घडले. तसेच त्यांना आर्थिक सहाय्यही मोठ्या प्रमाणात मिळाले. विद्यार्थ्यांच्या या सहभागातून शासनाच्या एका महत्त्वाच्या योजनेत सहभागी होता आले याचा मनापासून आनंद होतो. तसेच एका बाबीचा मला आवर्जून निर्देश करावासा वाटतो. या वर्षी *'दसरा'* या सणादिवशी विद्यापीठातील *'राष्ट्रीय सेवा योजना'* व *'मागेल त्याला काम'* या योजनेतील विद्यार्थ्यांनी सबंध दिवसभरात विद्यापीठ परिसरातील क्रीडा मैदान सामूहिक श्रमसंस्कारातून स्वच्छ केले. विद्यापीठाचे रा.से.यो. समन्वयक यांना राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्राप्त झाला आहे.

- <u>विद्यार्थी कल्याण विभाग</u>

विद्यार्थी कल्याण विभागाकडून गतवर्षात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तीन *विभागीय युवा महोत्सव* तसेच *मध्यवर्ती युवा महोत्सव* संपन्न झाले. तसेच *'इंद्रधनुष्य युवा महोत्सव'* व *पश्चिम विभागीय युवा महोत्सव* आणि चेन्नई येथे पार पडलेल्या *राष्ट्रीय युवा महोत्सवात* विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. विद्यापीठाने या स्पर्धांना संघ पाठविताना विजेत्या महाविद्यालयाचा संघ पाठविण्याऐवजी सर्वोत्कृष्ट गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा संघ पाठविण्यास सुरूवात केली आहे. या विभागाच्या एका उपक्रमाचा मला आवर्जून निर्देश करावासा वाटतो या विभागाने कार्यान्वित केलेल्या

*'गुरूजन एवं परिजन सुरक्षा विमा'* या योजनेस उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या योजनेचा उपयोग विद्यार्थी, पालक व कर्मचारी यांना होतो आहे. विशेष म्हणजे रूपये १५/- इतक्या कमी प्रिमियममध्ये विद्यार्थी व पालकांसाठी २४ तास विमा सुरक्षा उपलब्ध होते. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी या वर्षात पाचगणी येथे नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवाचे आयोजन विद्यापीठात करण्यात येणार आहे.

- <u>स्पर्धा परीक्षा</u>

विद्यापीठातील विविध विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. नेट व सेट, जेआरएफ या परीक्षांमध्ये शिवाजी विद्यापीठातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची तुलनात्मक संख्या महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठांपेक्षा मोठ्या प्रमाणात आहे ही अभिमानाची व आनंदाची बाब आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता रेमिडियल कोचिंग क्लास फॉर एससी/एसटी व रेमिडियल कोचिंग फॉर एन्ट्री लेव्हल या योजना राबविल्या जात आहेत. याचा लाभ विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी, रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी होत आहे. याचे फलित म्हणून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले.

- <u>दीक्षान्त समारंभ</u>

गतवर्षापासून दीक्षान्त समारंभाचे वैशिष्ट्यपूर्ण आयोजन विद्यापीठ करीत आहे. दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने तीन दिवसांच्या ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गतवर्षी हा उपक्रम यशस्वी झाला. ग्रंथ महोत्सवात सुमारे ५०,००० वाचकांनी भेटी दिल्या. वाचनसंस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी, तिचा विस्तार सर्वदूर पोहोचावा यादृष्टीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यानिमित्ताने प्रबोधनपर व्याख्याने नामवंत कवींचे कवी संमेलन, कथाकथन, परिसंवाद व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. विद्यापीठाचा हा एक शैक्षणिक, सांस्कृतिक महोत्सवच होय. यावर्षीही याप्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

● <u>भविष्यकालीन योजना</u>

एकविसाव्या शतकातील आव्हाने ओळखून माहिती तंत्रज्ञान व विज्ञान क्षेत्राची गरज असणारे कांही उपक्रम कार्यान्वित करण्याचा आमचा मानस आहे. यादृष्टीने विद्यापीठामध्ये एम.फार्म., बी.ई. इंटीग्रेटेड एम.बी.ए. अभ्यासक्रम व इतरही मूलभूत स्वरूपाचे अभ्यासक्रम आम्ही सुरू करतो आहोत. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विद्यापीठाच्या विकासासाठी काही पायाभूत योजनांची मागणी आम्ही केली आहे. त्यापैकी इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (**ISET**), इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर, सेंटर फॉर एन्टरप्राईज मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, इलेक्ट्रॉनिक मेडिया सेंटर, आंतरभारती स्कूल ऑफ लँग्वेजेस ॲण्ड फाईन आर्टस, कार्ल लिनॅआस बायोडायव्हर्सिटी पार्क याप्रकारची विशेष संशोधन केंद्रे स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी इनक्युबेशन केंद्रामार्फत विशेष सुविधा पुरविली जाणार आहे यासाठी भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ फूड प्रोसेसिंग इंडस्ट्री यांच्याकडून पन्नास लाख रूपयांचे अनुदान मिळाले आहे.

● <u>डी.लिट पदवी</u>

मित्रहो, जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात असामान्य कर्तृत्व सिध्द करणाऱ्या महनीय व्यक्तींना डी.लिट ही पदवी देऊन सन्मानित करण्याची विद्यापीठाची परंपरा आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची दीडशे वर्षे व भारतीय स्वातंत्र्याची साठ वर्षे या पार्श्वभूमीवर विद्यापीठ दोन महनीय व्यक्तींना *'डी.लिट.'* ही पदवी प्रदान करीत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या पदवीदान समारंभात ख्यातनाम लेखिका व ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती सुधा मूर्ती व ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांना ही पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या दोघांनीही आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या द्वारा असंख्य लोकांच्या जीवनात नवा अर्थ प्रदान केला आहे. भारताच्या शहरी व ग्रामीण भागात जे परिवर्तन होत आहे, जो नवा समाज निर्माण होत आहे त्या परिवर्तनाचे श्रीमती मूर्ती व श्री. नागनाथअण्णा हे प्रवर्तक आहेत. भारतात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नवी क्रांती घडवून आणणाऱ्या इन्फोसिस कंपनीच्या सामाजिक सेवा विभागाशी श्रीमती सुधा मूर्ती संबंधित आहेत. त्यांनी इन्फोसिस फौंडेशनच्या द्वारा आर्थिकदृष्ट्या मागास लोकांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबविले, दुर्लक्षित वर्गाच्या कल्याणासाठी व आपदग्रस्त लोकांच्या मदतीसाठी त्या अथक प्रयत्न करीत आहेत. श्रीमती मूर्ती ख्यातनाम लेखिका आहेत. मला हे सांगावयास आनंद वाटतो की, मराठी भूमीशी

विशेषत: कोल्हापूरशी त्यांचे जवळचे स्नेहबंध आहेत.

श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांनी तरुण वयात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या सातारच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे ते प्रमुख नेते होते. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या वेगवेगळ्या परिवर्तनवादी सामाजिक व राजकीय चळवळीत त्यांनी भाग घेतला. वंचितांच्या व उपेक्षित लोकांच्या अधिकारांसाठी ते सातत्याने लढत राहिले. वाळवा येथे हुतात्मा सहकारी साखर कारखाना स्थापन करून सहकार क्षेत्रात कारखाना कसा चालवावा याचा आदर्श त्यांनी समाजापुढे उभा केला. ग्रामीण भागात स्वाभिमानावर व सामाजिक न्यायावर अधिष्ठित नवी समाजरचना स्थापन करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.

आपापल्या क्षेत्रामध्ये समाजाला प्रगतीच्या आणि नव्या जीवनाच्या वाटा खुल्या करणाऱ्या या दोन महनीय व्यक्तींना शिवाजी विद्यापीठाची डी. लिट. ही सन्मानदर्शक पदवी प्रदान करताना आम्हांस आनंद होत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. सुखदेव थोरात हे आज आपणांस पाहुणे लाभले आहेत. आपणा सर्वांतर्फे त्यांचे स्वागत करताना मला आनंद होत आहे. डॉ. थोरात यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील माहिमपूर या गावी झाला असून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून अर्थशास्त्रात एम. ए. ही पदवी संपादन केली व पीएच. डी. ही पदवी दिल्लीच्या ख्यातनाम अशा जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून प्राप्त केली. त्याच विद्यापीठात ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. शेतीचे अर्थशास्त्र, ग्रामीण विकास समावेशक धोरण आणि सर्वसमावेशक आर्थिक विकास, डॉ. आंबेडकरांचे विचार, वंचितांचे मानवी अधिकार, ही त्यांच्या अभ्यासाची खास क्षेत्रे. ते दिल्ली येथील Institute of Dalit Studies या संशोधन संस्थेचे संचालक होते. त्यांची संशोधनपर अशी १७ पुस्तके प्रकाशित असून जवळपास ३० संशोधन प्रकल्पात ते सहभागी झाले आहेत. निमंत्रित व्याख्याता व संशोधक म्हणून त्यांची स्वीडन, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, डेन्मार्क, दक्षिण आफ्रिका, जपान या देशांना भेटी दिल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष झाल्यानंतर डॉ. थोरात यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशकता ही उच्च शिक्षणाच्या धोरणाची त्रिसूत्री ठरविली असून उच्च शिक्षणाच्या विकासासाठी त्यांनी अनेक नव्या दिशा खुल्या आहेत. सर्वसमावेशक धोरणांची व राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची मन:पूर्वक अंमलबजावणी करू पहाणाऱ्या एका द्रष्ट्या शिक्षणतज्ज्ञाचे स्वागत करताना मला आनंद होत आहे.

❑❑❑



प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–४१६ ००४.
मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर–४१६ ००४